# सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२[१]

# [ महाराष्ट्र प्राचीन स्मारके व पुराणवस्तुशास्त्रविषयक स्थळे व अवशेष अधिनियम,१९६० ]

[ २७ फेब्रुवारी, १९६१ ]

**महाराष्ट्र राज्यांतील (राष्ट्रीय महत्त्वाची म्हणून जाहीर केलेली प्राचीन व ऐतिहासिक स्मारके व अभिलेख व पुराणवस्तुशास्त्रविषयक स्थळे आणि अवशेष खेरीजकरुन इतर) प्राचीन व ऐतिहासिक स्मारके आणि अभिलेख व पुराणवस्तुशास्त्रविषयक स्थळे आणि अवशेष जतन करण्यासाठी आणि उपरोक्त कारणांशी संबंधित असलेल्या बाबींविषयी अधिक चांगली तरतूद करण्याबाबत अधिनियम.**

**ज्याअर्थी,** (राष्ट्रीय महत्त्वाची म्हणून जाहीर करण्यात आलेली प्राचीन व ऐतिहासिक स्मारके आणि अभिलेख व पुराणवस्तुशास्त्रविषयक स्थळे आणि अवशेष खेरीजकरून), महाराष्ट्र राज्यातील इतर प्राचीन व ऐतिहासिक स्मारके आणि अभिलेख व पुराणवस्तुशास्त्रविषयक स्थळे आणि अवशेष जतन करण्यासाठी आणि उपरोक्त कारणांशी संबंधित असलेल्या बाबींविषयी अधिक चांगली तरतूद करणे इष्ट आहे; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या अकराव्या वर्षी, याद्वारे, पुढीलप्रमाणे अधिनियम, करण्यात येत आहे :—

**लघु संज्ञा, व्याप्ती व प्रारंभ**

**१.** (१) या अधिनियमास महाराष्ट्र प्राचीन स्मारके व पुराणवस्तुशास्त्रविषयक स्थळे व अवशेष अधिनियम, १९६०, असे म्हणावे.

(२) तो, सबंध महाराष्ट्र राज्यास लागू असेल.

(३) तो, राज्य सरकार **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे जी तारीख[२] नेमून देईल त्या तारखेस अंमलात येईल.

**व्याख्या.**

**२.** संदर्भावरुन अन्यथा अर्थ लावणे आवश्यक नसेल तर, या अधिनियमात,—

(१) “प्राचीन व ऐतिहासिक स्मारके” या संज्ञेचा अर्थ, ज्यायोगे ऐतिहासिक पुराणवस्तुशास्त्रविषयक किंवा कलात्मकदृष्ट्या जिज्ञासा निर्माण होईल असा, आणि जो पन्नास वर्षांहून कमी नाही इतक्या कालावधीपासून अस्तित्वात असेल असा, कोणताही इमला, बांधकाम किंवा कोणतेही स्मारक किंवा कोणताही छत्रीवजा चबुतरा किंवा कोणतीही अंत्यसंस्काराची जागा किंवा कोणतीही गुहा, दगडी खोदकाम, खोदीव लेख किंवा दगडी स्तंभ असा समजावा; आणि त्यात पुढील गोष्टींचा समावेश होतो :—

(अ) अशा स्मारकाचे अवशेष,

(ब) अशा स्मारकाची जागा,

---

१. उद्देश व कारणे यांच्या निवेदनासाठी, पहा. महाराष्ट्राचे राजपत्र, १९६० भाग पाच इं. पृष्ठ ९० पहा.

२. ८ ऑक्टोबर, १९६२ (पहा. शा. अ.शि. व स. क. वि. क्र. एएनएम-२०६१-सी (एक) दिनांक १९ सप्टेंबर, १९६२).

(क) असे स्मारक ज्या जागेवर असेल ती जागा व असे स्मारक यांभोवती कुंपण घालण्याकरिता किंवा आच्छादनासाठी किंवा अन्यथा ते सुस्थितीत ठेवण्यासाठी आवश्यक असेल असा त्यास लागून असलेला भाग, आणि

(ड) अशा स्मारकाकडे जाण्यायेण्याची आणि त्याची सोईस्कर तपासणी करण्याची साधनें ;

(२) " प्राचीन काळच्या वस्तू " या संज्ञेत पन्नास वर्षांहून कमी नाही इतक्या, कालावधीपासून अस्तित्वात असलेल्या पुढील वस्तूंचा, म्हणजे,—

(अ) कोणतेही नाणे, शिल्प, हस्तलिखित पुस्तक, वास्तुलेख किंवा इतर कसबी किंवा कारागिरीचे काम,

(ब) इमारतीपासून किंवा गुहेतून वेगळा काढलेला कोणताही पदार्थ किंवा वस्तू,

(क) प्राचीन युगातील शास्त्र, कला, कारागिरी, वाङ्मय, धर्म, चालीरीती, नीति अनीतीच्या कल्पना किंवा राजकारण यांवर प्रकाश टाकील असा कोणताही लेख, पदार्थ किंवा वस्तू,

(ड) ऐतिहासिकदृष्ट्या जिज्ञासा उत्पन्न करील असा कोणताही पदार्थ किंवा वस्तू आणि

(ई) राज्य सरकारने **राजपत्रांतील** अधिसूचनेद्वारे ह्या अधिनियमाच्या कारणांकरिता, प्राचीन काळची वस्तू म्हणून जाहीर केलेला (ज्यास, राज्य सरकारच्या मते, त्याच्या ऐतिहासिक व पुराणवस्तुशास्त्रविषयक महत्त्वामुळे जतन करुन ठेवणे आवश्यक आहे असा) कोणताही पदार्थ किंवा वस्तू,

यांचा समावेश होतो;

(३) " पुराणवस्तुशास्त्र अधिकारी " या संज्ञेचा अर्थ, विभागीय अधिकाऱ्याच्या दर्जाहून कमी दर्जा नसलेला, राज्य सरकारच्या पुराणवस्तुशास्त्रविभागाचा अधिकारी, असा समजावा;

(४) " पुराणवस्तुशास्त्रविषयक स्थळे व अवशेष " या संज्ञेचा अर्थ, ऐतिहासिक किंवा पुराणवस्तुशास्त्रदृष्ट्या महत्त्वाचे असलेले आणि जे पन्नास वर्षांहून कमी नाही इतक्या कालावधीपासून अस्तित्वात असतील असे भग्नावशेष किंवा अवशेष ज्यांत आहेत किंवा असल्याबद्दल वाजवी कारण असेल असे कोणतेही क्षेत्र, असा समजावा आणि अशा क्षेत्रांत—

(अ) त्याभोवती कुंपण घालण्यासाठी किंवा त्यावर आच्छादन घालण्यासाठी किंवा अन्य रीतीने ती राखून ठेवण्यासाठी आवश्यक असेल असा, क्षेत्राला लागून असलेल्या जागेचा भाग, आणि

(ब) क्षेत्रात जाण्यायेण्याची आणि त्याची सोईस्कर तपासणी करण्याची साधने, यांचा समावेश होतो;

(५) "कलेक्टर" या संज्ञेचा अर्थ, मुंबई शहरात मुंबईचा कलेक्टर आणि इतरत्र जिल्ह्याचा कलेक्टर, असा समजावा व तीत, या अधिनियमान्वयेच्या किंवा त्याखालील कलेक्टरच्या कामांपैकी सर्व किंवा कोणतीही कामे पार पाडण्यासाठी राज्य सरकारने अधिकार दिलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याचा समावेश होतो;

(६) “ संचालक ” या संज्ञेचा अर्थ, राज्य सरकारने त्या त्या वेळी अभिलेख (archives) व ऐतिहासिक स्मारके यांचा संचालक म्हणून नियुक्त केलेला अधिकारी, असा समजावा, आणि तीत, या अधिनियमाखालील किंवा तदन्वयेच्या संचालकांच्या कामापैकी सर्व किंवा कोणतीही कामे पार पाडण्यासाठी राज्य सरकारने अधिकार दिलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याचा समावेश होतो;

(७) “ सुस्थितीत राखणे ” या संज्ञेत तीत व्याकरणदृष्ट्या होणारे फेरफार व समान संज्ञा धरुन संरक्षित स्मारकाभोवती कुंपण घालणे, आच्छादणे, त्याची दुरूस्ती करणे, त्यात सुधारणा करणे व ते स्वच्छ करणे यांचा आणि संरक्षित स्मारक जतन करण्याच्या कारणासाठी व तेथे सोईस्करपणे जाणेयेणे शक्य व्हावे म्हणून आवश्यक असेल असे कोणतेही कृत्य करणे याचा समावेश होतो;

(८) “ मालक ” या संज्ञेत —

(अ) ज्या संयुक्त मालकाकडे त्याच्या स्वत:च्या व इतर संयुक्त मालकाच्यावतीने व्यवस्था पाहण्याचे अधिकार निहीत केलेले असतील तो संयुक्त मालक व अशा कोणत्याही मालकाचा उत्तरस्वत्वाधिकारी, आणि

(ब) व्यवस्था पाहण्याचे अधिकार चालविणारा कोणताही व्यवस्थापक किंवा विश्वस्त व अशा कोणत्याही व्यवस्थापकाच्या किंवा विश्वस्ताच्या हुद्याचा उत्तराधिकारी, यांचा समावेश होतो;

(९) “ विहित केलेले ” या संज्ञेचा अर्थ, ह्या अधिनियमान्वये केलेल्या नियमांनी विहित केलेले, असा समजावा ;

(१०) “ संरक्षित क्षेत्र ” या संज्ञेचा अर्थ, ह्या अधिनियमान्वये किंवा त्याद्वारे संरक्षित क्षेत्र म्हणून जाहीर केलेले कोणतेही पुराणवस्तुशास्त्रविषयक स्थळ व अवशेष, असा समजावा;

(११) “ संरक्षित स्मारक ” या संज्ञेचा अर्थ, ह्या अधिनियमान्वये किंवा त्याद्वारे संरक्षित स्मारक म्हणून समजण्यात येणारे अथवा तसे स्मारक म्हणून जाहीर केलेले स्मारक, असा समजावा.

## संरक्षित स्मारके

**विवक्षित प्राचीन व ऐतिहासिक स्मारके संरक्षित स्मारके म्हणून समजणे.**

**३.** या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी महाराष्ट्र राज्यातील जी कोणतीही प्राचीन व ऐतिहासिक स्मारके, प्राचीन स्मारकांचे जतन करण्याबाबतच्या अधिनियमान्वये किंवा त्याद्वारे संरक्षित स्मारके म्हणून जाहीर करण्यात आली असतील, आणि जी संसदेने केलेल्या कोणत्याही विधि अन्वये किंवा त्याद्वारे राष्ट्रीय महत्त्वाची म्हणून जाहीर करण्यात आली नसतील अशी सर्व प्राचीन व ऐतिहासिक स्मारके ही या अधिनियमाच्या कारणासाठी संरक्षित स्मारके आहेत, असे समजले पाहिजे.

प्राचीन व ऐतिहासिक स्मारके संरक्षित स्मारके म्हणून जाहीर करण्याचा राज्य सरकारचा अधिकार.

**४.** (१) कलम ३ मध्ये समाविष्ट न केलेले आणि संसदेने केलेल्या कोणत्याही विधि अन्वये किंवा त्याद्वारे राष्ट्रीय महत्त्वाचे म्हणून जाहीर न केलेले जे कोणतेही प्राचीन व ऐतिहासिक स्मारक हे संरक्षित स्मारक असावे असे राज्य सरकारचे मत होईल तेव्हा, त्यास, राजपत्रात अधिसूचना प्रसिध्द करुन तीद्वारे, असे स्मारक हे संरक्षित स्मारक म्हणून जाहीर करण्याचा त्याचा इरादा असल्याबद्दलची दोन महिन्याची नोटीस देण्याचा अधिकार आहे; आणि अशा प्रत्येक अधिसूचनेची एक प्रत स्मारकाच्या जवळील ठळक जागी लावली पाहिजे.

(२) कोणत्याही अशा स्मारकात हितसंबंध असणाऱ्या कोणत्याही इसमास अधिसूचना प्रसिध्द झाल्यानंतर दोन महिन्यांच्या आत, असे स्मारक संरक्षित स्मारक म्हणून जाहीर करण्यास हरकत घेण्याचा अधिकार आहे.

(३) दोन महिन्यांची उक्त मुदत संपल्यानंतर, राज्य सरकारास त्याजकडे कोणत्याही हरकती आल्या असल्यास अशा हरकतींचा, विचार केल्यानंतर राजपत्रात अधिसूचना प्रसिद्ध करुन तीद्वारे प्राचीन व ऐतिहासिक स्मारक हे संरक्षित स्मारक असल्याचे जाहीर करण्याचा अधिकार आहे.

(४) पोट-कलम (३) अन्वये प्रसिध्द केलेली अधिसूचना, राज्य सरकारकडून मागे घेण्यात आली नाही तर व मागे घेण्यात येईपर्यंत, ज्या प्राचीन व ऐतिहासिक स्मारकासंबंधी ती असेल ते स्मारक संरक्षित स्मारक असल्याबद्दलचा निर्णायक पुरावा असेल.

संरक्षित स्मारकांचे हक्क संपादन करणे.

**५.** (१) कलेक्टरास राज्य सरकारची मंजुरी घेऊन कोणतेही स्मारक विकत घेण्याचा किंवा पट्ट्याने घेण्याचा किंवा बक्षीस म्हणून किंवा मृत्यूदानपत्रान्वये स्वीकारण्याचा अधिकार आहे.

(२) संरक्षित स्मारकाचा कोणी मालक नसेल त्याबाबतीत, कलेक्टरास राजपत्रात अधिसूचना प्रसिध्द करुन तीद्वारे; स्मारकाचे पालकत्व स्वत:कडे घेण्याचा अधिकार आहे.

(३) कोणत्याही संरक्षित स्मारकाच्या मालकास, लेखी दस्तऐवज करुन, कलेक्टरास त्या स्मारकाचा पालक म्हणून नेमण्याचा अधिकार आहे आणि कलेक्टरास राज्य सरकारची मंजुरी घेऊन, असे पालकत्व स्वीकारण्याचा अधिकार आहे.

(४) जेव्हा कलेक्टराने पोट-कलम (३) अन्वये स्मारकाचे पालकत्व स्वीकारले असेल तेव्हा मालकास, ह्या अधिनियमात स्पष्टपणे जी तरतूद केली असेल ती खेरीजकरुन, कलेक्टरास, स्मारकाचा पालक म्हणून नेमले नसते तर त्यास त्या स्मारकावरील किंवा त्या स्मारकासंबंधी जी इस्टेट, जे हक्क, मालकी हक्क आणि हितसंबंध असते तीच इस्टेट, तेच हक्क, मालकी हक्क आणि हितसंबंध असतील.

(५) कलेक्टराने पोट-कलम (३) अन्वये स्मारकाचे पालकत्व स्वीकारलेले असेल तेव्हा, उक्त पोट-कलमान्वये केलेल्या लेखी दस्तऐवजास, कलम ६ अन्वये केलेल्या कबुलायती-संबंधीचे ह्या अधिनियमाचे उपबंध लागू होतील.

(६) ह्या कलमांतील कोणत्याही मजकुरामुळे, कोणत्याही संरक्षित स्मारकाचा परंपरागत धार्मिक सणाकरिता उपयोग करण्यास बाध येणार नाही.

**६.** (१) राज्य सरकारची पूर्वमंजुरी घेऊन कलेक्टराने, संरक्षित स्मारकाचे जतन करण्यासाठी निर्दिष्ट केलेल्या मुदतीच्या आत, राज्य सरकारशी कबुलायत करण्यास संरक्षित स्मारकाच्या मालकास सुचविले पाहिजे. कबुलायत करुन संरक्षित स्मारक जतन करणे.

(२) या कलमान्वयेच्या कबुलायतीत, पुढीलपैकी सर्व किंवा कोणत्याही गोष्टीची तरतूद करण्याचा अधिकार आहे :—

(अ) स्मारक सुस्थितीत राखणे;

(ब) स्मारकाची अभिरक्षा व त्याची देखरेख करण्याच्या कामावर लावलेल्या कोणत्याही इसमाची कर्तव्ये;

(क) (१) कोणत्याही कारणासाठी स्मारक वापरण्याच्या;

(२) स्मारकाच्या जागी प्रवेश करण्याबद्दल किंवा त्याची तपासणी करण्याबद्दल कोणतीही फी आकारण्याच्या;

(३) स्मारकाचा नाश करणे, ते हलविणे, त्यात फेरफार करणे किंवा ते विद्रूप करणे याबाबतच्या; किंवा

(४) स्मारकाच्या जागेवर किंवा जागेनजीक बांधकाम करण्याच्या, मालकाच्या हक्कावर निर्बंध घालणे;

(ड) सर्व लोकांना किंवा काही लोकांना किंवा मालकाने किंवा संचालकाने किंवा कलेक्टरने स्मारकाची तपासणी करण्यासाठी किंवा ते सुस्थितीत ठेवण्यासाठी प्रतिनियुक्त केलेल्या इसमांना, जाण्या-येण्याच्या सोईची परवानगी देणे;

(ई) ज्या जागेवर स्मारक असेल ती जागा किंवा लगत असलेली कोणतीही जागा मालकाने विकण्यास काढली असता, राज्य सरकारास द्यावयाची नोटीस, आणि अशी जागा किंवा अशा जागेचा कोणताही निर्दिष्ट केलेला भाग, त्याच्या बाजारभावाने विकत घेण्याचा हक्क राज्य सरकारसाठी राखून ठेवणे;

(फ) स्मारक सुस्थितीत राखण्यासंबंधी मालकास किंवा राज्य सरकारास आलेला कोणताही खर्च देणे;

(ग) स्मारक सुस्थितीत ठेवण्याच्या संबंधात राज्य सरकारने कोणताही खर्च केला असेल त्या बाबतीत, स्मारकाचे राज्य सरकारकडे निहित व्हावयाचे मालकी किंवा इतर हक्क;

(ह) कबुलायतीतून उद्भवणाऱ्या कोणत्याही तक्रारीचा निकाल लावण्यासाठी प्राधिकाऱ्याची नेमणूक करणे; आणि

(आय) स्मारक सुस्थितीत राखण्यासंबंधी मालक आणि राज्य सरकार यामधील कबुलायतीचा योग्य विषय असेल अशी कोणतीही गोष्ट.

(३) राज्य सरकारास किंवा मालकास, ह्या कलमान्वये कबुलायत केल्याच्या तारखेपासून तीन वर्षे संपल्यानंतर, कोणत्याही वेळी, दुसऱ्या पक्षकारास सहा महिन्यांनी नोटीस देऊन ती कबुलायत संपुष्टात आणण्याचा अधिकार आहे:

परंतु, मालकाने कबुलायत संपुष्टात आणली असेल तेव्हा, त्याने कबुलायत संपुष्टात आणण्याच्या निकटपूर्वीच्या पाच वर्षांच्या काळात किंवा कबुलायत कमी मुदतीकरिता अंमलात असेल तर ज्या मुदतीपर्यंत कबुलायत अंमलात होती त्या मुदतीत, राज्य सरकारने कोणताही खर्च केला असल्यास असा खर्च, त्यास दिला पाहिजे.

(४) ह्या कलमान्वये केलेली कोणतीही कबुलायत ही ज्या स्मारकासंबंधी ती असेल त्या स्मारकाचा ज्या पक्षाकडून किंवा ज्या पक्षाच्या वतीने कबुलायत करण्यात आली होती त्या पक्षामार्फत किंवा पक्षाच्या वतीने मालक म्हणून दावा सांगणाऱ्या कोणत्याही इसमावर बंधनकारक असेल.

अपात्रतेखाली येणारे किंवा कब्जा नसणारे मालक.

**७.** (१) जर मालक बाल्यावस्थेत असल्यामुळे किंवा इतर अपात्रतेच्या कारणामुळे स्वत:च्या वतीने काम करण्यास असमर्थ असेल तर, त्याच्या वतीने काम करण्यास वैधरीत्या सक्षम असलेल्या इसमास, कलम ६ अन्वये मालकास मिळालेले अधिकार चालविता येतील.

(२) गावाच्या मालमत्तेच्या बाबतीत, अशा मालमत्तेवरील व्यवस्थापकाचे हक्क चालविणाऱ्या प्रमुखास किंवा गावाच्या अधिकाऱ्यास, कलम ६ अन्वये मालकास मिळालेले अधिकार चालविता येतील.

(३) ह्या कलमांतील कोणत्याही मजकुरामुळे, जो कोणताही इसम, ज्याच्या वतीने तो काम करीत असेल त्या इसमाच्या धर्माचा नसेल तर त्यास, जे स्मारक किंवा त्याचा कोणताही भाग मुदतीमुदतीने धार्मिक पूजेसाठी किंवा विधीसाठी वापरण्यात येत असेल त्या स्मारकाच्या संबंधात कबुलायत करण्याचा किंवा ती अंमलात आणण्याचा अधिकार मिळाला आहे असे समजता कामा नये.

एखादी देणगी संरक्षित स्मारकाची दुरुस्ती करण्याच्या कामी लावणे.

**८.** (१) कोणताही मालक किंवा संरक्षित स्मारक सुस्थितीत राखण्यासाठी कलम ६ अन्वये कबुलायत करण्यास सक्षम असलेला कोणताही इतर इसम अशी कबुलायत करण्याचे नाकारील किंवा ती करण्यास कसूर करील आणि जर अशा स्मारकाची दुरुस्ती करण्याच्या कारणासाठी किंवा इतर कारणांसहित उक्त कारणासाठी कोणतीही देणगी सुरु केली असेल तर, राज्य सरकारास जिल्हा न्यायाधीशाच्या न्यायालयात दावा दाखल करण्याचा किंवा जर स्मारकाच्या दुरुस्तीचा अंदाजलेला खर्च रुपये एक हजाराहून जास्त नसेल तर, अशी देणगी किंवा तिचा भाग योग्य अशा कामी लावण्यासंबंधी जिल्हा न्यायाधीशाकडे अर्ज करण्याचा अधिकार आहे.

(२) पोट-कलम (१) अन्वये केलेल्या अर्जाची सुनावणी केल्यावर, जिल्हा न्यायाधीशास, मालकाला व ज्याचा पुरावा घेणे त्यास आवश्यक वाटत असेल अशा कोणत्याही इसमाला आज्ञापत्र काढून बोलविण्याचा व त्यांची तपासणी करण्याचा अधिकार आहे व देणगी किंवा देणगीचा भाग योग्य कामी लावण्याबाबत आदेश देण्याचा अधिकार आहे. असा कोणताही आदेश, हा जणू काही दिवाणी न्यायालयाचा हूकूमनामा आहे असे समजून त्याची अंमलबजावणी करण्याचा अधिकार आहे.

कबुलायत करण्याचे नाकारणे किंवा ती करण्यात कसूर करणे.

**९.** (१) कोणताही मालक किंवा संरक्षित स्मारक सुस्थितीत राखण्यासाठी कलम ६ अन्वये कबुलायत करण्यास सक्षम असलेला इतर इसम अशी कबुलायत करण्याचे नाकारील किंवा ते करण्यात कसूर करील तर, राज्य सरकारास कलम ६ पोट-कलम (२) मध्ये निर्दिष्ट केलेल्या सर्व किंवा कोणत्याही गोष्टींची तरतूद करण्याबाबत आदेश देण्याचा अधिकार आहे आणि असा आदेश हा, मालकावर किंवा अशा इसमावर आणि मालकाकडून किंवा अशा इसमाकडून किंवा त्याच्यामार्फत किंवा त्याच्या वतीने हक्क सांगणाऱ्या प्रत्येक इसमावर बंधनकारक असेल.

(२) मालकाने किंवा कबुलायत करण्यास सक्षम असलेल्या इतर इसमाने स्मारक सुस्थितीत राखावे अशी, पोट-कलम (१) अन्वये दिलेल्या आदेशात तरतूद केलेली असेल तेव्हा, स्मारक सुस्थितीत राखण्याकरिता जो वाजवी खर्च येईल तो राज्य सरकारने दिला पाहिजे.

(३) नियोजित आदेशाविरुध्द, मालकास किंवा इतर इसमास लेखी अर्ज करण्याची संधी दिल्यावाचून, पोट-कलम (१) अन्वये कोणताही आदेश देता कामा नये.

कलम ६ अन्वये केलेल्या कबुलायतीचे उल्लंघन करण्यास प्रतिबंध करण्याबाबत आदेश देण्याचा अधिकार.

**१०.** (१) संरक्षित स्मारकाच्या मालकाचा किंवा त्याचा भोगवटा करणाऱ्या इसमाचा कलम ६ अन्वये केलेल्या कबुलायतीच्या अटीचे उल्लंघन करुन ते स्मारक नष्ट करण्याचा, काढून टाकण्याचा, त्यात फेरफार करण्याचा, ते विद्रूप करण्याचा, ते धोक्यात आणण्याचा किंवा त्याचा दुरुपयोग करण्याचा किंवा त्याच्या जागेवर किंवा जागेनजीक बांधकाम करण्याचा इरादा आहे अशी कलेक्टरास भीती वाटत असेल तर मालकास किंवा भोगवटा करणाऱ्या इसमास लेखी निवेदन करण्याची संधी दिल्यानंतर, कलेक्टरास कबुलायतीचे कोणतेही असे उल्लंघन करण्यास प्रतिबंध करण्याबाबत आदेश देण्याचा अधिकार आहे:

परंतु, लेखी नमूद करावयाच्या कारणांसाठी अशाप्रकारे संधी देणे इष्ट किंवा व्यवहार्य नाही अशी कलेक्टर याची खात्री होईल तर, कोणत्याही बाबतीत अशी संधी देता कामा नये.

(२) ह्या कलमान्वये दिलेल्या आदेशामुळे नुकसान झालेल्या कोणत्याही इसमास विहित करण्यात येईल अशा मुदतीत व अशा पध्दतीने, राज्य सरकारकडे अपील करता येईल आणि राज्य सरकारचा निर्णय अखेरचा असेल.

कबुलायतीची अंमल-बजावणी

**११.** (१) जो मालक किंवा इतर इसम, कलम ६ अन्वये केलेल्या कबुलायतीअन्वये, स्मारक सुस्थितीत राखण्याबद्दल बांधला गेला असेल तो मालक किंवा इतर इसम कलेक्टरच्या मते स्मारक सुस्थितीत ठेवण्यासाठी जे कृत्य करणे आवश्यक असेल ते कृत्य कलेक्टर ठरवील अशा वाजवी मुदतीत करण्याचे नाकारील किंवा करण्यात कसूर करील तर कलेक्टरास कोणत्याही इसमास, कोणतेही असे कृत्य करण्यासाठी अधिकार देता येईल आणि मालक किंवा इतर इसम, कोणतेही असे कृत्य करण्याबद्दल आलेला खर्च देण्यास किंवा कबुलायतीअन्वये खर्चाचा जो भाग देण्यास मालक पात्र असेल तो भाग देण्यास जबाबदार राहील.

(२) मालकाने किंवा इतर इसमाने पोट-कलम (१) अन्वये द्यावयाच्या खर्चाच्या संबंधात कोणतीही तक्रार उदभवली तर ती, निर्णयासाठी राज्य सरकारकडे पाठविली पाहिजे व राज्य सरकारचा त्यावरील निर्णय अखेरचा असेल.

विवक्षित विक्रीच्या वेळी खरेदीदार आणि मालकाच्या वतीने दावा सांगणारे इसम, मालकाने करुन दिलेल्या दस्तऐवजाबाबत बांधलेले असणे.

**१२.** जो इसम जमीन महसुलाच्या थकबाकीसाठी किंवा कोणत्याही इतर सरकारी मागणीसाठी केलेल्या विक्रीच्या वेळी, ज्या संरक्षित स्मारकाच्या बाबतीत मालकाने कलम ५ किंवा कलम ६ अन्वये त्या त्या वेळी कोणताही दस्तऐवज करुन दिला असेल ते स्मारक ज्या जमिनीवर असेल ती कोणतीही जमीन खरेदी करील असा प्रत्येक इसम आणि ज्याने संरक्षित स्मारकाबाबत असा कोणताही दस्तऐवज करुन दिला असेल त्या मालकाकडून, त्याच्या वतीने किंवा त्याच्यातर्फेस्मारकावर कोणत्याही मालकी हक्काचा दावा सांगणारा प्रत्येक इसम हे, अशा दस्तऐवजाबाबत बांधलेले असतील.

संरक्षित स्मारके संपादन करणे.

**१३.** राज्य सरकारास अशी भीती वाटेल की, एखादे संरक्षित स्मारक नष्ट केले जाण्याचा, त्यास हानी पोहोचविली जाण्याचा, त्याचा गैरवाजवी रीतीने वापर केला जाण्याचा किंवा त्याचा ऱ्हास होऊ दिला जाण्याचा धोका आहे तर, त्यास भूमि संपादन अधिनियम, १८९४ चा १
१८९४, याच्या उपबंधान्वये किंवा राज्याच्या कोणत्याही भागात अंमलात असलेल्या कोणत्याही तत्सम विधिअन्वये, जणू एखाद्या संरक्षित स्मारकाचे जतन करणे हे त्या अधिनियमाच्या अर्थाप्रमाणे सार्वजनिक कारण असल्याप्रमाणे, ते संपादन करण्याचा अधिकार आहे.

विवक्षित संरक्षित स्मारके सुस्थितीत राखणे.

**१४.** (१) कलम १३ अन्वये संपादन केलेले प्रत्येक स्मारक किंवा ज्यासंबंधी कलम ५ मध्ये उल्लेख केलेल्या हक्कांपैकी कोणतेही हक्क मिळविलेले असतील ते स्मारक, राज्य सरकारने सुस्थितीत राखले पाहिजे.

(२) जेव्हा कलेक्टराने कलम ५ अन्वये स्मारकाचे पालकत्व स्वीकारले असेल तेव्हा त्यास, असे स्मारक सुस्थितीत राखण्यासाठी स्वत:ला आणि त्याच्या अभिकर्त्यांना, हाताखाली काम करणाऱ्या इसमांना आणि कामगारांना, त्या स्मारकाची तपासणी करण्याच्या कारणासाठी, आणि ते सुस्थितीत राखण्याच्या कारणासाठी त्यास आवश्यक किंवा इष्ट वाटेल असे सामान आणण्याच्या आणि अशी कामे करण्याच्या कारणासाठी त्या स्मारकाजवळ सर्व वाजवी वेळी जाता येईल.

**१५.** संचालकास, संरक्षित स्मारक सुस्थितीत राखण्यासाठी स्वेच्छेने दिलेल्या देणग्या स्विकारण्याचा अधिकार आहे आणि अशाप्रकारे त्याच्याकडे आलेल्या कोणत्याही निधीची व्यवस्था लावण्याबाबत व तो कामी लावण्याबाबत आदेश देण्याचा अधिकार आहे : **स्वेच्छेने दिलेली अंशदाने.**

परंतु, ह्या कलमान्वये दिलेली कोणतीही देणगी ती ज्या कारणासाठी देण्यात आली होती, त्या कारणाव्यतिरिक्त इतर कोणत्याही कारणासाठी तिचा उपयोग करता कामा नये.

**१६.** (१) राज्य सरकारने या कलमान्वये सुस्थितीत राखलेले जे स्मारक, पूजेचे स्थान किंवा पवित्र स्थान असेल ते, त्याच्या स्वरुपाशी विसंगत असेल अशा कोणत्याही कारणाकरिता वापरता कामा नये. **पूजास्थानाचा गैरवाजवी रीतीने वापर करण्यापासून, ते भ्रष्ट होऊ देण्यापासून, संरक्षण.**

(२) जेव्हा राज्य सरकारने, कलम १३ अन्वये संरक्षित स्मारक संपादन केले असेल किंवा कलेक्टराने कलम ५ अन्वये स्मारक विकत घेतले असेल, किंवा पट्ट्याने किंवा मृत्यूपत्रदानाने घेतले असेल किंवा त्याचे पालकत्व स्वीकारले असेल, आणि असे स्मारक किंवा त्याचा कोणताही भाग कोणत्याही समाजाकडून धार्मिक पूजेसाठी किंवा विधीसाठी वापरण्यात येत असेल तेव्हा कलेक्टराने, असे स्मारक किंवा त्याचा कोणताही भाग भ्रष्ट किंवा अपवित्र होऊ देण्यापासून त्याचे संरक्षण करण्यासाठी—

(अ) उक्त स्मारक किंवा त्याचा भाग धार्मिकदृष्ट्या ज्यांच्या स्वाधीन असेल त्या इसमाच्या कोणतेही असल्यास, मतैक्याने ठरविलेल्या शर्तीनुसार असेल ते खेरीजकरुन, समाजाच्या ज्या धार्मिक रिवाजाप्रमाणे स्मारक किंवा त्याचा भाग वापरण्यात येत असेल त्या धार्मिक रिवाजानुसार त्यात प्रवेश करण्याचा हक्क नसलेल्या कोणत्याही इसमास अशाप्रकारे प्रवेश करण्यास प्रतिबंध करुन किंवा

(ब) याबाबत त्यास आवश्यक वाटेल अशी इतर उपाययोजना करुन, योग्य व्यवस्था केली पाहिजे.

**१७.** (१) जर राज्य सरकारच्या मते कोणत्याही संरक्षित स्मारकाची रम्यता जतन करण्याच्या कारणासाठी तसे करणे आवश्यक असेल तर, राज्य सरकारास ह्या कलमाच्या उपबंधास अधीन राहून, राजपत्रांतील अधिसूचनेद्वारे अशा अधिसूचनेत निर्दिष्ट केलेले असे स्मारक समाविष्ट असलेल्या जागेच्या किंवा अशा जागेच्या आसपास असलेल्या कोणत्याही क्षेत्राच्या संबंधात — (ज्यास यात यापुढे "नियंत्रित क्षेत्र" असे म्हटले आहे) **प्राचीन स्मारकाची रम्यता जतन करणे.**

(अ) नियंत्रित क्षेत्रातील जमिनीवरील इमारती, इमले व इतर कामे बांधणे, उभारणे किंवा पार पाडणे किंवा अशा कोणत्याही इमारती, इमले किंवा कामे यात, त्यांच्या बाह्य स्वरुपावर विशेष परिणाम होईल अशा रीतीने फेरफार करणे किंवा वाढ करणे यास मनाई करण्याचा किंवा त्यावर निर्बंध घालण्याचा;

(ब) नियंत्रित क्षेत्रातील जमिनीवरील इमारती, इमले व इतर कामे यांची जागा, उंची, आकार, नमुना, सामान, रंग व संरक्षण करण्याची रीत विहित करण्याचा व त्याच्या बाह्य स्वरुपाचे इतर रीतीने नियमन करण्याचा;

(क) कोणत्याही स्थानिक प्राधिकाऱ्यास—

(१) कोणत्याही संरक्षित स्मारकाकडे जाण्याचा कोणताही रस्ता बांधण्यास, किंवा

(२) त्याच्याकडे निहित असलेली, कोणत्याही संरक्षित स्मारकाच्या अगदी जवळ किंवा त्याच्या आजुबाजूस असलेली सार्वजनिक सोयीची कोणतीही जागा म्हणजे संडास, मुत्री, कचरा टाकण्याची पेटी, व त्यासारख्याच इतर गोष्टी पाडून टाकण्यास,

फर्माविण्याचा ;

(ड) नियंत्रित क्षेत्रांत झाडे तोडण्यास मनाई करण्याचा किंवा त्यावर निर्बंध घालण्याचा ;

(ई) नियंत्रित क्षेत्रात जमिनीचा वापर करण्यावर, संरक्षित स्मारकाची रम्यता जतन करण्याच्या कारणासाठी राज्य सरकारास इष्ट वाटेल अशा मर्यादेपर्यंत इतर रीतीने निर्बंध घालण्याचा ;

(फ) ज्या बाबी ह्या कलमाच्या पूर्ववर्ती उपबंधास आनुषंगिक किंवा परिणामभूत आहेत किंवा ते उपबंध अंमलात आणण्यासाठी आवश्यक आहेत असे राज्य सरकारास वाटेल अशा इतर बाबींची तरतूद करण्याचा;

अधिकार आहे.

(२) पोट-कलम (१) अन्वये अधिसूचना प्रसिध्द करण्यापूर्वी पंचेचाळीस दिवसाहून कमी नाही इतक्या मुदतीत राज्य सरकारने, नियंत्रित प्रदेशात आणि सदरहू नियंत्रित क्षेत्र ज्या गावात किंवा जिल्ह्यातील ज्या तालुक्यात किंवा महालात असेल त्या गावात किंवा जिल्ह्यातील त्या तालुक्याच्या किंवा महालाच्या मुख्य ठिकाणी पोट-कलम (१) मध्ये सांगितल्याप्रमाणे अधिसूचना काढण्याचे राज्य सरकारने योजिले आहे असे नमूद करणारी अधिसूचना राजपत्रात प्रसिध्द करविली पाहिजे आणि अशा अधिसूचनेमुळे ज्यांच्यावर परिणाम झाला आहे असे जे इसम अशी अधिसूचना काढण्यास हरकत घेऊ इच्छित असतील त्या सर्व इसमांस आपल्या हरकती सदरहू अधिसूचना राजपत्रात प्रसिध्द केल्यापासून एक महिन्याच्या आत किंवा सदरहू अधिसूचना नियंत्रित क्षेत्रात प्रसिध्द केल्याच्या तारखेपासून पंधरा दिवसाच्या आत यापैकी जी मुदत उशिरा संपत असेल त्या मुदतीत राज्य सरकारास, लेखी सादर करण्यास किंवा राज्य सरकारच्या वतीने हरकती ऐकून घेण्याचा त्याबाबत योग्य रीतीने अधिकार दिलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यापुढे हजर होण्यास फर्माविणारी नोटीस अशा अधिसूचनेबरोबर प्रसिध्द केली पाहिजे.

(३) जर हरकती दाखल करण्यासाठी पोट-कलम (२) अन्वये परवानगी दिलेली मुदत संपण्यापूर्वी, कोणतीही हरकत घेण्यात आली नसेल तर, राज्य सरकारने ताबडतोब पोट-कलम (१) अन्वये अधिसूचना काढण्याच्या कामास लागले पाहिजे. जर अशी कोणतीही हरकत घेण्यात आली असेल तर, राज्य सरकारास, सर्व हरकतीचा यथास्थिति, विचार केल्यावर किंवा त्या ऐकून घेतल्यावर एकतर—

(अ) पोट-कलम (१) अन्वयेची अधिसूचना काढण्याबाबतची सूचना रद्द करण्याचा ; किंवा

(ब) पोट-कलम (१) अन्वयेची अधिसूचना, त्यास योग्य वाटेल अशा फेरफारांसह काढण्याचा ;

अधिकार आहे.

(४) हरकतीचा विचार करताना, पोट-कलम (१) अन्वयेची अधिसूचना काढण्याच्या प्रश्नावरील राज्य सरकारचा निर्णय अखेरचा व निर्णायक असेल.

(५) पोट-कलम (१) अन्वयेच्या कोणत्याही अधिसूचनेतील कोणत्याही मजकुरामुळे कोणतीही इमारत, इमला किंवा जमिनीवर असणारे कोणतेही इतर बांधकाम यास, किंवा त्यात केलेला कोणताही फेरबद्दल किंवा त्यात केलेली कोणतीही वाढ यास, अशी अधिसूचना काढण्याच्या इराद्याची नोटीस पोट-कलम (२) अन्वये ज्या तारखेस देण्यात आली होती त्या तारखेपूर्वी जर ते बांधले, उभारले किंवा पार पाडले असेल तर, बाध येणार नाही, आणि या उपबंधाच्या कारणासाठी एखादी इमारत, इमला किंवा इतर बांधकाम आणि त्यात केलेला कोणताही फेरबदल किंवा त्यात केलेली कोणतीही वाढ ही जर,—

(अ) ती बांधण्याचे, उभारण्याचे किंवा पार पाडण्याचे काम त्या तारखेपूर्वी सुरु करण्यात आले असेल तर, किंवा

(ब) जर, आणि जेथवर, ती बांधण्याचे, उभारण्याचे किंवा पार पाडण्याचे काम त्या तारखेपूर्वी केलेला करार पुरा करण्याच्या कारणाकरिता आवश्यक असेल तर आणि तेथवर,

त्या तारखेपूर्वी बांधण्यात, उभारण्यात किंवा पार पाडण्यात आले आहे असे समजण्यात आले पाहिजे.

(६) ज्या कोणत्याही इसमाच्या मालमत्तेवर पोट-कलम (१) अन्वयेची अधिसूचना अंमलात आल्यामुळे हानिकारक परिणाम झाला असेल त्यास, कलम २० च्या उपबंधास अधीन राहून, राज्य सरकारकडून त्याच्या संबंधात नुकसानभरपाई मिळविण्याचा हक्क असेल.

**स्मारकावरील सरकारचे हक्क सोडून देणे.**

**१८.** राज्य सरकारची मंजुरी घेऊन कलेक्टरला, —

(अ) जेव्हा कलेक्टरने या अधिनियमान्वये कोणत्याही स्मारकाच्या बाबतीत कोणतीही विक्री, पट्टा, देणगी किंवा मृत्यूपत्र याअन्वये हक्क संपादन केले असतील तेव्हा, अशा रीतीने संपादन केलेले हक्क, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, जर असे हक्क संपादन करण्यात आले नसते तर, जो इसम त्या त्या वेळी स्मारकाचा मालक असता त्या इसमाच्या नावे करुन देण्याचा; किंवा

(ब) त्याने ह्या अधिनियमान्वये स्मारकाचे जे कोणतेही पालकत्त्व स्वीकारले असेल ते सोडून देण्याचा,

अधिकार आहे.

संरक्षित स्मारकाकडे जाण्यायेण्याचा हक्क.

**१९.** ह्या अधिनियमान्वये केलेल्या कोणत्याही नियमांस अधीन राहून, लोकांना कोणत्याही संरक्षित स्मारकाजवळ जाण्यायेण्याचा हक्क असेल.

## संरक्षित क्षेत्रे

पुराणवस्तुशास्त्र-विषयक स्थळे व अवशेष हे संरक्षित क्षेत्र असल्याचे जाहीर करण्याचा राज्य सरकारचा अधिकार.

**२०.** (१) संसदेने केलेल्या कोणत्याही विधीद्वारे किंवा तदन्वये राष्ट्रीय महत्त्वाचे असल्याचे जाहीर न केलेले कोणतेही पुराणवास्तुशास्त्रविषयक स्थळ व अवशेष संरक्षित क्षेत्र असावेत असे राज्य सरकारचे मत असेल त्याबाबतीत, त्यास राजपत्रातील अधिसूचनेद्वारे असे पुराणवस्तुशास्त्रविषयक स्थळ व अवशेष हे संरक्षित क्षेत्र असल्याचे जाहीर करण्याचा आपला इरादा असल्याची दोन महिन्यांची नोटीस देण्याचा अधिकार आहे आणि अशा प्रत्येक अधिसूचनेची प्रत ते स्थळ व अवशेष यांच्याजवळ ठळक जागी लावून ठेवली पाहिजे.

(२) असे कोणतेही पुराणवस्तुशास्त्रविषयक स्थळ व अवशेष यात हितसंबंध असलेल्या कोणत्याही इसमास, उक्त अधिसूचना काढल्यानंतर दोन महिन्यांच्या आत, उक्त पुराणवस्तुशास्त्रविषयक स्थळ व अवशेष हे संरक्षित क्षेत्र आहेत असे जाहीर करण्यास हरकत घेण्याचा अधिकार आहे.

(३) दोन महिन्यांची उक्त मुदत संपल्यानंतर, राज्य सरकारला, त्यास मिळालेल्या हरकतीचा (कोणत्याही असल्यास) विचार केल्यानंतर राजपत्रातील अधिसूचनेद्वारे पुराणवस्तुशास्त्र विषयक स्थळ व अवशेष संरक्षित क्षेत्र असल्याचे जाहीर करण्याचा अधिकार आहे.

(४) पोट-कलम (३) अन्वये प्रसिध्द केलेली अधिसूचना, ती मागे घेण्यात आली नसेल तर मागे घेण्यात येईपर्यंत, ती ज्या पुराणवस्तुशास्त्रविषयक स्थळाबाबत व अवशेषाबाबत असेल ते पुराणवस्तुशास्त्रविषयक स्थळ व अवशेष या अधिनियमाच्या कारणासाठी संरक्षित क्षेत्र असल्याचा निर्णायक पुरावा असेल.

संरक्षित क्षेत्रात मालमत्ता हक्क उपभोगण्यावर निर्बंध.

**२१.** (१) संरक्षित क्षेत्राचा मालक किंवा भोगवटा करणारा इसम धरुन, कोणत्याही इसमाने राज्य सरकारची परवानगी घेतल्यावाचून संरक्षित क्षेत्राच्या हद्दीत कोणतीही इमारत बांधता कामा नये. किंवा अशा क्षेत्रात कोणतेही खाणकाम, खाणीतून दगड काढण्याचे काम, उत्खननाचे काम, सुरुंग लावण्याचे काम किंवा तशाच प्रकारचे कोणतेही काम चालविता कामा नये. किंवा असे क्षेत्र किंवा त्याचा कोणताही भाग याचा इतर कोणत्याही रीतीने उपयोग करता कामा नये:

परंतु, ह्या पोट-कलमांतील कोणत्याही मजकुरामुळे, अशा कोणत्याही क्षेत्राचा किंवा त्याच्या भागाचा, शेतीच्या कारणासाठी, जर अशा शेतीमुळे जमिनीत पृष्ठभागापासून एक फुटापेक्षा अधिक खणण्याची जरुरी नसेल तर, उपयोग करण्यास प्रतिबंध होतो असे समजता कामा नये.

(२) राज्य सरकारास आदेशाद्वारे असा निदेश देण्याचा अधिकार आहे की, ज्या कोणत्याही इसमाने पोट-कलम (१) च्या उपबंधाचे उल्लंघन करुन जी कोणतीही इमारत संरक्षित क्षेत्राच्या हद्दीत बांधली असेल ती इमारत निर्दिष्ट केलेल्या मुदतीत काढून टाकली पाहिजे आणि तो इसम आदेशाचे पालन करण्याचे नाकारील किंवा पालन करण्यात कसूर करील तर कलेक्टरास ती इमारत काढून टाकण्याविषयी व्यवस्था करण्याचा अधिकार आहे व अशा प्रकारे काढून टाकण्याचा खर्च देण्यास तो इसम जबाबदार राहील.

१८९४ चा १. **२२.** जर राज्य सरकारचे असे मत असेल की, कोणत्याही संरक्षित क्षेत्रात प्राचीन स्मारक किंवा राष्ट्रीय दृष्ट्या महत्त्वाच्या असलेल्या पुरातन काळातील मौल्यवान वस्तू आहेत तर त्यास असे क्षेत्र, भूमि संपादन अधिनियम, १८९४, याच्या उपबंधान्वये किंवा राज्याच्या कोणत्याही भागात अंमलात असलेल्या कोणत्याही तत्सम विधीअन्वये, जणू काही असे संपादन करणे हे त्या अधिनियमाच्या अर्थाप्रमाणे सार्वजनिक कारणासाठी आहे असे समजून, संपादन करण्याचा अधिकार आहे. संरक्षित क्षेत्र संपादन करण्याचा अधिकार.

## पुराणवस्तुशास्त्रविषयक उत्खनन

१९५८ चा २४. **२३.** प्राचीन स्मारके व पुराणवस्तुशास्त्रविषयक स्थळे व अवशेष याबाबत अधिनियम, १९५८ यांच्या कलम २४ च्या उपबंधास अधीन राहून पुराणवस्तुशास्त्र अधिकाऱ्यास किंवा याबाबत अधिकार दिलेल्या अधिकाऱ्यास किंवा याबाबत ह्या अधिनियमान्वये दिलेले लैसेन्स धारण करणाऱ्या इसमास (ज्याचा यात पुढे लैसेन्स धारण करणारा असा उल्लेख केला आहे) कलेक्टला व मालकाला लेखी नोटीस दिल्यानंतर कोणत्याही संरक्षित क्षेत्रात प्रवेश करण्याचा व उत्खनन करण्याचा अधिकार आहे. संरक्षित क्षेत्रात उत्खनन करणे.

**२४.** (१) कलम २३ अन्वये केलेल्या कोणत्याही उत्खननानंतर पुरातन काळच्या वस्तू सापडतील तेव्हा यथास्थिति पुराणवस्तुशास्त्र अधिकाऱ्याने किंवा लैसेन्स धारण करणाऱ्या इसमाने —— उत्खनन चालू असतांना सापडलेल्या पुरातन काळच्या वस्तू वगैरे सक्तीने विकत घेणे.

(अ) शक्य तितक्या लवकर अशा वस्तूंची तपासणी केली पाहिजे व त्याबाबत विहित करण्यात येईल अशा रीतीने व असे तपशील देऊन राज्य सरकारला प्रतिवृत्त सादर केले पाहिजे.

(ब) उत्खननाचे काम संपल्यावर ज्या मालकाच्या जागेतून अशा पुरातन काळच्या वस्तू मिळाल्या असतील त्यास लेखी नोटीस देऊन पुरातन काळच्या अशा वस्तुंच्या स्वरुपाविषयी त्यास माहिती दिली पाहिजे.

(२) पुरातन काळच्या कोणत्याही अशा वस्तू सक्तीने खरेदी करण्याबाबत, पोट-कलम (३) अन्वये आदेश देण्यात येईतोपर्यंत यथास्थिति, पुराणवस्तुशास्त्र अधिकाऱ्यास किंवा लैसन्स धारण करणाऱ्या इसमाने त्या वस्तू त्याच्या मते योग्य असतील अशा सुरक्षित अभिरक्षेत ठेवण्याचा अधिकार आहे.

(३) पोट-कलम (१) अन्वयेचे प्रतिवृत्त मिळाल्यावर राज्य सरकारास पुरातन काळच्या कोणत्याही अशा वस्तू बाजारभावाने सक्तीने खरेदी करण्याबाबत आदेश देण्याचा अधिकार आहे.

(४) पुरातन काळची कोणतीही वस्तू सक्तीने खरेदी करण्याबाबत, पोट-कलम (३) अन्वये आदेश दिला असेल तेव्हा, ज्या तारखेस आदेश दिला असेल त्या तारखेपासून, पुरातन काळच्या अशा वस्तू राज्य सरकारमध्ये निहित होतील.

## पुरातन काळच्या वस्तूंचे संरक्षण

**पुरातन काळच्या वस्तू हलविण्यावर नियंत्रण ठेवण्याचा राज्य सरकारचा अधिकार.**

**२५.** (१) ज्या ठिकाणी पुरातन काळच्या कोणत्याही वस्तू असतील किंवा वस्तूंचे वर्ग असतील त्या ठिकाणावरुन त्या वस्तू किंवा वस्तुंचे वर्ग राज्य सरकारच्या मंजुरीवाचून हलविता कामा नये असे राज्य सरकारचे मत असेल तर राज्य सरकारास, राजपत्रात अधिसूचना प्रसिध्द करुन तीद्वारे, पुरातन काळच्या कोणत्याही अशा वस्तू, किंवा कोणत्याही अशा वस्तूचे वर्ग कलेक्टरच्या लेखी परवानगी शिवाय हलविता कामा नये असा निदेश देण्याचा अधिकार आहे.

(२) पोट-कलम (१) अन्वये परवानगीसाठी केलेला प्रत्येक अर्ज, विहित करण्यात येईल असेल अशा नमुन्यात व अशा तपशिलांसह असला पाहिजे.

(३) परवानगी नाकारल्यामुळे नुकसान झालेल्या कोणत्याही इसमास, राज्य सरकारकडे अपील करण्याचा अधिकार आहे. आणि राज्य सरकारचा त्यावरील निर्णय अखेरचा असेल.

**पुरातन काळच्या वस्तू राज्य सरकारने विकत घेणे.**

**२६.** (१) कलम २५, पोट-कलम (१) अन्वये काढलेल्या अधिसूचनेत उल्लेख केलेल्या पुरातन काळच्या कोणत्याही वस्तूंचा नाश केला जाण्याचा, ती काढून नेली जाण्याचा, तिचे नुकसान केले जाण्याचा, तिचा गैरवाजवी रीतीने उपयोग केला जाण्याचा किंवा तिचा ऱ्हास होऊ दिला जाण्याचा धोका आहे, अशी जर राज्य सरकारास भीती वाटेल तर किंवा अशी वस्तू तिच्या ऐतिहासिक किंवा पुराणवस्तुशास्त्राच्या दृष्टीने असलेल्या महत्त्वामुळे ती सार्वजनिक जागी जतन करून ठेवणे इष्ट आहे असे त्याचे मत असेल तर राज्य सरकारास अशी पुरातन काळची वस्तू तिच्या बाजारभावाने सक्तीने खरेदी करण्यासाठी आदेश देण्याचा अधिकार आहे आणि त्यानंतर कलेक्टरने, खरेदी करावयाच्या वस्तूच्या मालकास नोटीस दिली पाहिजे.

(२) पुरातन काळच्या कोणत्याही वस्तूच्या संबंधात, ती सक्तीने खरेदी करण्यासाठी पोट-कलम (१) अन्वये नोटीस दिलेली असेल तेव्हा, अशी वस्तू, ज्या तारखेस नोटीस दिली असेल त्या तारखेपासून, राज्य सरकारकडे निहित होईल.

(३) या कलमान्वये दिलेला सक्तीने खरेदी करण्याचा अधिकार, कोणत्याही खरोखरीच्या धार्मिक विधीसाठी प्रत्यक्षपणे उपयोगात आणली जाणारी कोणतीही मूर्ति किंवा कोणतेही प्रतीक यास लागू असणार नाही.

## नुकसानभरपाई देण्यासंबंधीची तत्त्वे

**नुकसान किंवा हानी पोहचल्याबद्दल नुकसान भरपाई देणे.**

**२७.** जमिनीच्या ज्या कोणत्याही मालकाचे किंवा तिचा भोगवटा करणाऱ्या इसमाचे अशा जमिनीत प्रवेश केल्यामुळे किंवा तीत उत्खनन केल्यामुळे किंवा या अधिनियमान्वये प्रदान केलेला कोणताही इतर अधिकार चालविल्यामुळे नुकसान किंवा हानी झाली असेल किंवा ती जमिनीपासून मिळणाऱ्या उत्पन्नात घट झाली असेल तर त्यास, राज्य सरकारने असे नुकसान, हानी किंवा उत्पन्नात अशी घट झाल्याबद्दल नुकसानभरपाई दिली पाहिजे.

२८. (१) ह्या अधिनियमान्वये बाजारभावाप्रमाणेच्या ज्या किंमतीने कोणतीही मालमत्ता खरेदी करण्याचा राज्य सरकारला अधिकार देण्यात आला असेल ती कोणत्याही मालमत्तेची बाजार किंमत किंवा या अधिनियमान्वये केलेल्या कोणत्याही गोष्टीच्या संबंधात राज्य सरकारने द्यावयाची नुकसानभरपाई ही, जेव्हा अशा बाजारभावाप्रमाणेच्या किंमतीच्या किंवा नुकसानभरपाईच्या संबंधात कोणताही वाद उद्‌भवेल तेव्हा, भूमि संपादन अधिनियम, १८९४ कलमे ३, ५, ८ ते ३४, ४५ ते ४७, ५१ व ५२ यात किंवा राज्याच्या कोणत्याही भागात अंमलात असलेल्या उक्त भूमि संपादन अधिनियमाच्या कोणत्याही तत्सम विधीच्या तशाच उपबंधात, जेथवर ती लागू करता येतील तेथवर, तरतूद केलेल्या रीतीने ठरविण्यात आली पाहिजे: बाजार किंमत किंवा नुकसान भरपाई ठरविणे.

१८९४ चा १

परंतु, उक्त भूमि संपादन अधिनियमान्वये किंवा तत्सम विधीन्वये चौकशी करताना, कलेक्टरास दोन न्यायसहाय्यकांनी मदत केली पाहिजे. त्यापैकी एक न्यायसहाय्यक हा, राज्य सरकारने नियुक्त केलेला सक्षम इसम असेल व दुसरा, मालकाने नियुक्त केलेला किंवा याबाबत कलेक्टर ठरवील अशा वाजवी वेळेच्या आत न्यायसहाय्यक नियुक्त करण्यात मालक कसूर करील त्या बाबतीत, कलेक्टराने नियुक्त केलेला एक इसम असेल.

१८९४ चा १

(२) पोट-कलम (१) किंवा उक्त भूमि संपादन अधिनियमात किंवा तत्सम विधींत कोणताही मजकूर असला तरीही, ज्या कोणत्याही पुरातन काळच्या वस्तुंच्या संबंधाने कलम २४, पोट-कलम (३) अन्वये किंवा कलम २६, पोट-कलम (१) अन्वये, ती वस्तू सक्तीने खरेदी करण्याबाबत आदेश दिलेला असेल त्या वस्तुंची बाजार किंमत ठरविताना, ती वस्तू ऐतिहासिक किंवा पुराणवस्तुशास्त्राच्या दृष्टीने महत्त्वाची असल्याच्याकारणामुळे तिची कोणतीही वाढलेली किंमत विचारात घेता कामा नये.

२९. (१) कोणत्याही इसमास, कलम १७, पोट-कलम (१) खाली काढलेल्या कोणत्याही अधिसूचनेच्या संबंधात, ज्या तारखेस अशी अधिसूचना अंमलात येईल त्या तारखेपासून तीन महिन्यांच्या आत किंवा राज्य सरकार विशिष्ट परिस्थितीत परवानगी देईल अशा जादा मुदतीच्या आत त्याने नुकसान भरपाईच्या कारणांकरिता राज्य सरकार ठरवील अशा रीतीने मागणी केली नसेल तर, नुकसानभरपाई मिळण्याचा हक्क असणार नाही. कलम १७ अन्वये नुकसान भरपाई संबंधीची खास तरतूद.

(२) कोणत्याही इसमास, त्याने केलेले किंवा करविलेले कोणतेही कृत्य किंवा गोष्ट, अशा अधिसूचनेवरुन, जर किंवा जेथवर असे कृत्य किंवा गोष्ट ज्या तारखेस अशी अधिसूचना काढण्यात आली होती त्या तारखेनंतर करण्यात आली असेल तर किंवा तेथवर निष्फळ झाली आहे या कारणावरुन किंवा त्या तारखेनंतर त्याने केलेल्या कोणत्याही कराराप्रमाणे काम करण्यास उक्त अधिसूचनेमुळे मनाई झालेली आहे या कारणावरुन नुकसानभरपाई मिळण्याचा हक्क असणार नाही.

(३) जेव्हा, अशा अधिसूचनेचा कोणताही उपबंध, उक्त अधिसूचना अंमलात येण्याच्या निकटपूर्वी या किंवा इतर कोणत्याही अधिनियमामुळे आधीच अंमलात असेल तेव्हा अशा अधिसूचनेच्या त्या उपबंधामुळे कोणत्याही मालमत्तेस नुकसानी पोहोचली आहे या कारणावरुन, जर नुकसानभरपाई देण्यात आली असेल किंवा तिच्याबद्दल दावा सांगण्यात आला असेल किंवा आधीच अंमलात असलेल्या उपबंधामुळे त्या मालमत्तेस नुकसानी पोहोचली आहे या कारणावरुन ती देण्याजोगी नसेल तर, कोणतीही नुकसानभरपाई देण्याजोगी असणार नाही.

(४) जेव्हा, अशा अधिसूचनेचा कोणताही उपबंध, ती अंमलात येण्याच्या निकटपूर्वी इतर कोणत्याही अधिनियमामुळे एखादी योजना, आदेश, विनियम किंवा उपविधी यांत वैधरीत्या समाविष्ट करणे शक्य होते तेव्हा,—

(अ) जर अशा उपबंद ती योजना, आदेश, विनियम किंवा उपविधी यांत समाविष्ट केल्याच्या कारणावरुन कोणतीही नुकसानभरपाई देण्याजोगी झाली नसती तर, उक्त अधिसूचनेच्या त्या उपबंधाच्या संबंधात कोणतीही नुकसानभरपाई देण्याजोगी असणार नाही; आणि

(ब) जर नुकसानभरपाई अशा रीतीने देण्याजोगी झाली असती तर, उक्त अधिनिसूचनेच्या त्या उपबंधाच्या संबंधात देण्याजोग्या नुकसानभरपाईची रक्कम ही, जी नुकसानभरपाई अशा रीतीने देण्याजोगी झाली असती त्या नुकसानभरपाईच्या रकमेपेक्षा अधिक असता कामा नये ;

(५) जी रक्कम अशा अधिसूचनेच्या संबंधात नुकसानभरपाई म्हणून देण्यात यावयाची असेल त्या रकमेसंबंधीच्या कोणत्याही वादाचा निर्णय कलम २८ च्या उपबंधानुसार करण्यात आला पाहिजे.

## संकीर्ण

राज्य सल्लागार मंडळ.

**३०.** (१) संरक्षित स्मारके व संरक्षित क्षेत्रे जतन करण्याच्या व ती सुस्थितीत राखण्याच्या बाबतीत आणि राज्य सरकारकडून त्याजकडे सोपविण्यात येतील अशा ह्या अधिनियमाच्या अंमलबजावणीस आनुषंगिक असतील अशा इतर बाबतीत राज्य सरकारला सल्ला देण्यासाठी राज्य सरकारास, ते निर्दिष्ट करील अशा नावाच्या एका सल्लागार मंडळाची रचना करण्याचा अधिकार आहे.

(२) सल्लागार मंडळाची रचना, त्याच्या सदस्यांच्या पदाचा अवधी आणि त्याच्या कामकाजाची कार्यरीती विहित करण्यात येईल, अशी असेल.

(३) मंडळाच्या सदस्यांना विहित करण्यात येईल असा प्रवास भत्ता मिळण्याचा हक्क असेल.

अधिकार सोपविणे.

**३१.** राज्य सरकारास, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे असा निदेश देण्याचा अधिकार आहे की, ह्या अधिनियमान्वये किंवा तद्नुसार त्याला दिलेले कोणतेही अधिकार, निदेशात निर्दिष्ट करण्यात येतील अशा शर्तीस अधीन राहून, संचालक किंवा निदेशात निर्दिष्ट करण्यात येईल असा कलेक्टरच्या दर्जाहून कमी दर्जाचा नसेल असा कोणताही अधिकारी यांनीही चालविण्याजोगे असतील.

**३२.** या अधिनियमात काहीही असले तरी, राज्य सरकारास या अधिनियमाच्या अंमलबजावणीशी संबंधित असलेल्या बाबतीत आपल्या अधिकाऱ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी वेळोवेळी निदेश देण्याचा अधिकार आहे आणि अधिकाऱ्यानी अशा निदेशाचे पालन केले पाहिजे. **निदेश देण्याचा अधिकार.**

**३३.** (१) जो कोणी— **शास्ति.**

(एक) संरक्षित स्मारकाचा नाश करील, ते काढून घेईल, त्याचे नुकसान करील, त्यात फेरफार करील, ते विद्रूप करील, ते खराब करील किंवा त्याचा गैरवाजवी रीतीने उपयोग करील, किंवा

(दोन) संरक्षित स्मारकाचा मालक किंवा भोगवटा करणारा असून, कलम ९, पोट-कलम (१) किंवा कलम १०, पोट-कलम (१) अन्वये दिलेल्या आदेशाचे उल्लंघन करील, किंवा

(तीन) संरक्षित स्मारकामधून कोणतेही शिल्पकाम, कोणतेही खोदकाम, कोणतीही प्रतिमा, उठावाची कामे, कोणताही शिलालेख किंवा इतर कोणतीही तत्सम वस्तू काढून घेईल, किंवा

(चार) कलम २१, पोट-कलम (१) चे उल्लंघन होईल असे कोणतेही कृत्य करील, तर त्यास, दोषी ठरविण्यात आले असता, पराकाष्ठा तीन महिने मुदतीच्या कैदेची शिक्षा किंवा पराकाष्ठा पाच हजार रुपये दंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

(२) कलम १७, पोट-कलम (१) अन्वये काढण्यात आलेल्या अधिसूचनेच्या कोणत्याही उपबंधाचे उल्लंघन करणाऱ्या कोणत्याही इसमास दोषी ठरविण्यात आले असता, पराकाष्ठा दोन हजार रुपये दंडाची शिक्षा होईल आणि दोषसिध्दीनंतरही उल्लंघन करणे चालू ठेवल्यास, अशारीतीने उल्लंघन करण्याचे चालू असलेल्या प्रत्येक दिवसाबद्दल आणखी पंचवीस रुपये दंडाची शिक्षा होईल आणि न्यायालय ठरवील ती मुदत संपल्यानंतर असे उल्लंघन चालू ठेवण्यात आल्यास, राज्य सरकारला अशा इमारतीचा, इमल्याचा किंवा बांधकामाचा जो भाग अशा अधिसूचनेच्या उपबंधानुरुप नसेल तो भाग अशा उपबंधानुरुप करण्यासाठी असा भाग काढून टाकण्याकरिता, त्याच्या मते आवश्यक असतील अशी सर्व कृत्ये करण्याचा जादा अधिकार असेल, आणि राज्य सरकारला आलेला कोणताही खर्च दोषी ठरविण्यात आलेल्या इसमाकडून जमीन महसुलाची थकबाकी म्हणून वसूल करण्याजोगा असेल.

(३) जो कोणताही इसम कलम २५, पोट-कलम (१) अन्वये काढण्यात आलेल्या अधिसूचनेचे उल्लंघन करून पुरातन वस्तू काढून नेईल त्यास दोषी ठरविण्यात आले असता पराकाष्ठा पाच हजार रुपये दंडाची शिक्षा होईल; आणि असे कोणतेही उल्लंघन केल्याबद्दल एखाद्या इसमास दोषी ठरविणाऱ्या न्यायालयास अशा इसमास ती पुरातन वस्तू ज्या ठिकाणाहून काढून नेली तेथे परत आणून ठेवण्याविषयी निदेश देण्याचा अधिकार आहे.

अपराधाची न्याय चौकशी करण्याचा क्षेत्राधिकार.

**३४.** प्रेसिडेन्सी फौजदारी न्यायाधीश किंवा पहिल्या वर्गाचा फौजदारी न्यायाधीश याच्यापेक्षा कमी दर्जा असलेल्या कोणत्याही न्यायालयाने या अधिनियमाखालील कोणत्याही अपराधाची न्यायचौकशी करता कामा नये.

विवक्षित अपराध दखल घेण्याजोगे असणे.

**३५.** दंड प्रक्रिया संहिता, १८९८ हीत काहीही असले तरीही, कलम ३३, पोट-कलम (१) ची कंडिका (एक) किंवा कंडिका (तीन) अन्वयेचा अपराध त्या संहितेच्या अर्थाप्रमाणे दखल घेण्याजोगा अपराध आहे असे समजले पाहिजे. १८९८ चा ५

दंडासंबंधी विशेष तरतुदी

**३६.** *दंड प्रक्रिया संहिता, १८९८ हीचे कलम ३२ यात काहीही असले तरीही, राज्य सरकारने या बाबतीत खास अधिकार खास दिलेल्या पहिल्या वर्गाच्या कोणत्याही फौजदारी न्यायाधीशाने आणि कोणत्याही प्रसिडेन्सी फौजदारी न्यायाधीशाने या अधिनियमान्ये जो अपराध दोन हजार रुपयांपेक्षा अधिक दंडाच्या शिक्षेस पात्र असेल त्या अपराधाबद्दल दोषी ठरविण्यात आलेल्या कोणत्याही इसमास दोन हजार रुपयांपेक्षा अधिक दंडाची शिक्षा देणे हे विधिसंमत असेल. १८९८ चा ५

सरकारास येणे असलेल्या रकमांची वसुली.

**३७.** राज्य सरकारास या अधिनियमान्वये कोणत्याही इसमाकडून येणे असलेली कोणतीही रक्कम संचालकाने किंवा राज्य सरकारने या बाबतीत अधिकार दिलेल्या अधिकाऱ्याने प्रमाणपत्र दिल्यावर जमीन महसुलाची थकबाकी ज्या पद्धतीने वसूल करण्याजोगी असते त्याच पध्दतीने वसूल करता येईल.

संरक्षित स्मारके आणि संरक्षित क्षेत्रे असण्याचे बंद झालेली स्मारके व जागा.

**३८.** संरक्षित स्मारके किंवा संरक्षित क्षेत्रे म्हणून जाहीर केलेले कोणतेही प्राचीन व ऐतिहासिक स्मारक किंवा पुराणवस्तुशास्त्रविषयक स्थळ व अवशेष हे असे स्मारक किंवा क्षेत्र असण्याचे बंद व्हावे असे राज्य सरकारचे मत असेल तर त्यास, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे ते प्राचीन व ऐतिहासिक स्मारक किंवा पुराणवस्तुशास्त्रविषयक स्थळ व अवशेष हे संरक्षित स्मारक किंवा संरक्षित क्षेत्र असण्याचे बंद झाले आहे असे जाहीर करण्याचा अधिकार आहे आणि त्यानंतर असे स्मारक किंवा क्षेत्र हे या अधिनियमाच्या कारणाकरिता संरक्षित स्मारक किंवा संरक्षित क्षेत्र असण्याचे बंद होईल.

चुका वगैरे सुधारण्याचा अधिकार.

**३९.** या अधिनियमान्वये किंवा तद्नुसार संरक्षित स्मारक किंवा संरक्षित क्षेत्र म्हणून जाहीर केलेले कोणतेही प्राचीन स्मारक किंवा पुराणवस्तुशास्त्रविषयक स्थळ व अवशेष यांच्या वर्णनात झालेली लेखनातील कोणतीही चूक, उघड उघड दिसणारी चूक किंवा मागाहून लावलेल्या चिठ्ठीमुळे किंवा ती न लावल्यामुळे झालेली चूक ही, राजपत्रात प्रसिध्द केलेल्या अधिसूचनेद्वारे कोणत्याहीवेळी सुधारण्याचा राज्य सरकारास अधिकार आहे.

या अधिनियमान्वये केलेल्या कृत्यांचे संरक्षण.

**४०.** या अधिनियमान्वये मिळालेला कोणताही अधिकार चालवून केलेल्या किंवा सद्भावनापूर्वक करावयाचा इरादा असलेल्या कोणत्याही कृत्याच्या संबंधात कोणत्याही लोकसेवकाविरूध्द नुकसानभरपाईसाठी कोणताही दावा किंवा कोणतेही फौजदारी कामकाज चालविता येणार नाही.

---

*दंड प्रक्रिया संहिता, १८९८ ऐवजी आता फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा दोन) असे वाचावे.

**४१.** (१) राज्य सरकारास, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे आणि ते आगाऊ प्रसिध्द करण्याच्या शर्तीस अधीन राहून, ह्या अधिनियमाचे उद्देश पार पाडण्याच्या कारणांसाठी नियम करण्याचा अधिकार आहे. **नियम करण्याचा अधिकार.**

(२) विशेषत: आणि मागील उपबंधाच्या सामान्यतेस बाध येऊ न देता, अशा नियमात पुढीलपैकी सर्व किंवा कोणत्याही गोष्टीसाठी तरतूद करण्याचा अधिकार आहे :—

(अ) संरक्षित स्मारकाजवळ खाणकाम, खाणीतून दगड काढणे, उत्खनन करणे, सुरुंग लावणे किंवा तत्सम स्वरूपाचे कोणतेही काम करणे यास आणि अशा स्मारकाच्या लगतच्या जमिनीवर इमारत बांधणे, यास प्रतिबंध करणे किंवा त्यांचे लैसेन्स देऊन किंवा इतर रीतीने नियमन करणे व अनधिकृत इमारती काढून टाकणे;

(ब) संरक्षित क्षेत्रात, पुराणवस्तुशास्त्राच्या कारणांकरिता उत्खनन करण्यास लैसेन्से देणे व परवानगी देणे, अशी लैसेन्से कोणत्या प्राधिकाऱ्याने व कोणत्या निर्बंधास व शर्तीस अधीन राहून दिली पाहिजेत ते ठरविणे व लैसेन दिलेल्या इसमाकडून तारणपत्रे घेणे व अशा लैसेन्सासाठी आकारावयाची फी ठरविणे;

(क) संरक्षित स्मारकाकडे जाण्यायेण्याचा लोकांचा अधिकार आणि त्याकरिता फी, कोणतीही असल्यास, आकारणे;

(ड) पुराणवस्तुशास्त्र अधिकाऱ्याने किंवा लैसेन दिलेल्या इसमाने कलम २४, पोट-कलम (१) ची कंडिका (अ) अन्वये सादर करावयाच्या प्रतिवृत्ताचा नमुना व त्यातील मजकूर;

(ई) कलम २१ किंवा कलम २५ अन्वये परवानगी मिळण्यासाठी करावयाच्या अर्जाचा नमुना व त्यात कोणता तपशील असावा ते;

(फ) ह्या अधिनियमान्वये दाखल करावयाच्या अपिलांचा नमुना व रीत, आणि ती ज्या मुदतीच्या आत दाखल केली पाहिजेत ती मुदत;

(ग) ह्या अधिनियमान्वये कोणताही आदेश किंवा नोटीस बजावण्याची रीत;

(ह) पुराणवस्तुशास्त्राच्या कारणाकरिता करावयाची उत्खनने व तत्सम प्रकारची कामे ही ज्या रीतीने केली पाहिजेत ती रीत;

(आय) राज्य सल्लागार मंडळाची रचना, त्याच्या सदस्यांच्या पदाचा अवधी आणि त्याची कार्यपध्दती आणि त्याच्या सदस्यांना द्यावयाचे प्रवासभत्ते;

(जे) विहित करावयाची किंवा विहित करण्यात येईल अशी इतर कोणतीही गोष्ट.

(३) ह्या कलमान्वये केलेल्या कोणत्याही नियमात त्या नियमांचा भंग केल्याबद्दल,—

(एक) पोट-कलम (२), कंडिका (अ) च्या संबंधात केलेल्या नियमाच्या बाबतीत, पराकाष्ठा तीन महिन्याच्या कैदेची शिक्षा किंवा पराकाष्ठा पाच हजार रुपये दंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील;

(दोन) पोट-कलम (२), कंडिका (ब) च्या संबंधात केलेल्या नियमाच्या बाबतीत, पाच हजार रुपये दंडाची शिक्षा होईल;

(तीन) पोट-कलम (२), कंडिका (क) च्या संबंधात केलेल्या नियमाच्या बाबतीत, पाचशे रुपये दंडाची शिक्षा होईल;

अशी तरतूद करण्याचा अधिकार आहे.

(४) ह्या कलमान्वये केलेले सर्व नियम, ते करण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवले पाहिजेत आणि ते ज्या अधिवेशनात अशा रीतीने ठेवण्यात आले असतील त्या अधिवेशनात किंवा त्याच्या लगतनंतरच्या अधिवेशनात राज्य विधानमंडळ त्यात जे फेरफार करील अशा फेरफारांस अधीन असतील.

इतर काही विधी लागू असण्यास मनाई नसणे.

**४२.** स्पष्टपणे जी तरतूद करण्यात आली असेल ती खेरीज करुन, या अधिनियमाचे उपबंध, प्राचीन स्मारके व पुराणवस्तुशास्त्रविषयक स्थळे व अवशेष याबाबत अधिनियम, १९५८, याचे उपबंध जेथवर ते भारताच्या संविधानातील सप्तम अनुसूचीतील सूची ३ मधील नोंद क्रमांक ४० शी संबंधित असतील तेथवर त्या उपबंधाशिवाय किंवा त्या नोंदीसंबंधी तत्काली अंमलात असलेल्या कोणत्याही इतर विधिशिवाय आणखी असतील व त्यामुळे अशा विधींच्या उपबंधांचे अल्पीकरण होणार नाही. १९५८ चा २४

रद्द करणे व बचाव.

**४३.** या अधिनियमाच्या प्रारंभाच्या तारखेस पुढील अधिनियम रद्द करण्यात येतील :—

(१) महाराष्ट्र राज्यास लागू असलेला आणि जेथवर संविधानाच्या सप्तम अनुसूचीतील सूची २ मधील नोंद १२ व सूची ३ मधील नोंद ४० यांच्याशी संबंधित असेल तेथवर, प्राचीन स्मारके जतन करण्याबाबत अधिनियम, १९०४; १९०४ चा ७

(२) महाराष्ट्र राज्याच्या हैदराबाद प्रदेशात लागू असलेला प्राचीन स्मारके जतन करण्याबाबत अधिनियम : फसली १३३७ चा हैद्र. ८.

परंतु, अशा रीतीने अधिनियम रद्द केल्यामुळे, —

(अ) अशा रीतीने रद्द केलेल्या कोणत्याही विधीचा पूर्वीचा अंमल किंवा तद्न्वये योग्य रीतीने केलेली किंवा करु दिलेली कोणतीही गोष्ट;

(ब) अशा रीतीने रद्द केलेल्या कोणत्याही विधींन्वये संपादन केलेला किंवा प्राप्त झालेला कोणताही हक्क, विशेष अधिकार किंवा पत्करलेले कोणतेही बंधन किंवा जबाबदारी;

(क) अशा रीतीने रद्द केलेल्या कोणत्याही विधीविरुध्द केलेल्या कोणत्याही अपराधाच्या संबंधात झालेली कोणतीही शास्ति, जप्ती किंवा शिक्षा; किंवा

(ड) वर सांगितलेल्या अशा कोणत्याही हक्काच्या, विशेषाधिकाराच्या, बंधनाच्या, जबाबदारीच्या, शास्तीच्या, जप्तीच्या किंवा शिक्षेच्या संबंधातील कोणतीही चौकशी, वैध कारवाई किंवा उपाययोजना,

यांस बाध येणार नाही आणि जणू हा अधिनियम, संमत करण्यात आला नव्हता असे समजून अशी कोणतीही चौकशी, वैध कारवाई किंवा उपाययोजना दाखल करता येईल, चालू ठेवता येईल किंवा अंमलात आणता येईल आणि अशी कोणतीही शास्ति, जप्ती किंवा शिक्षा करता येईल :

तसेच, मागील परंतुक व कलम ३ यांस अधीन राहून, रद्द केलेल्या कोणत्याही अधिनियमान्वये केलेली कोणतीही गोष्ट किंवा उपाययोजना ही (यात केलेली कोणतीही नेमणूक, दिलेले अधिकार, काढलेली कोणतीही अधिसूचना, जाहीरनामा, दिलेला कोणताही निदेश, आदेश किंवा केलेला कोणताही नियम किंवा नमुना, दिलेली कोणतीही मान्यता, परवानगी किंवा लायसेन्स किंवा केलेला कोणताही करार यांचा समावेश होतो) जेथवर या अधिनियमाच्या उपबंधाशी विसंगत नसेल तेथवर, या अधिनियमाच्या तत्सम उपबंधान्वये करण्यात आली आहे असे समजले पाहिजे व या अधिनियमान्वये केलेल्या कोणत्याही गोष्टीद्वारे किंवा उपाययोजनेद्वारे ती रद्द करण्यात आली नसेल तर किंवा रद्द करण्यात येईपर्यंत ती त्याप्रमाणे अंमलात असल्याचे चालू राहील.

**राष्ट्रीय महत्त्वाची प्राचीन स्मारके इत्यादीस हा अधिनियम लागू नसणे.**

१९५८ चा २४. **४४.** (१) या अधिनियमातील कोणतीही गोष्ट, संसदेने केलेल्या कोणत्याही विधीन्वये किंवा तद्नुसार राष्ट्रीय दृष्ट्या महत्त्वाच्या म्हणून जाहीर केलेल्या, प्राचीन वा ऐतिहासिक स्मारकास किंवा पुराणवस्तुशास्त्रविषयक स्थळास किंवा अवशेषास आणि ज्यांस, प्राचीन स्मारके व पुराणवस्तुशास्त्रविषयक स्थळे व अवशेष याबाबत अधिनियम, १९५८, लागू आहे अशा पुरातन वस्तुस लागू असणार नाही.

(२) जेव्हा कोणतेही प्राचीन व ऐतिहासिक स्मारक किंवा कोणतेही पुराणवस्तुशास्त्र-विषयक स्थळ व अवशेष हे या अधिनियमाच्या उपबंधाअन्वये किंवा तद्नुसार संरक्षित स्मारक किंवा संरक्षित क्षेत्र असेल व संसदेने केलेल्या कोणत्याही विधीन्वये ते राष्ट्रीय दृष्ट्या महत्त्वाचे म्हणून कोणत्याही वेळी जाहीर करण्यात आले असेल तर या अधिनियमाचे उपबंध अशा स्मारकास किंवा क्षेत्रास लागू असण्याचे बंद होईल; आणि त्याप्रमाणे या अधिनियमाच्या कारणाकरिता ते संरक्षित स्मारक किंवा संरक्षित क्षेत्र असण्याचे बंद होईल.

येरवडा कारागृह मुद्रणालय, पुणे - ४११ ००६.

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

विधि व न्याय विभाग

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२

# महाराष्ट्र प्राचीन स्मारके व पुराणवस्तुशास्त्रविषयक स्थळे व अवशेष अधिनियम, १९६०

( २१ डिसेंबर, २०१३ पर्यंत सुधारित )

**Maharashtra Act No. XII of 1961**

# The Maharashtra Ancient Monuments And Archaeological Sites And Remains Act, 1960

**( As modified up to the 21st December, 2013 )**

व्यवस्थापक, येरवडा कारागृह मुद्रणालय, पुणे-४११ ००६
यांच्याद्वारे भारतात मुद्रित आणि संचालक, शासन मुद्रण व लेखन सामग्री विभाग,
महाराष्ट्र राज्य, मुंबई - ४०० ००४ यांच्याद्वारे प्रकाशित

२०१३

[ किंमत : रुपये २१ ]

# महाराष्ट्र प्राचीन स्मारके व पुराणवस्तुशास्त्रविषयक स्थळे व अवशेष अधिनियम, १९६०

## अनुक्रमणिका

उद्देशिका

**कलमे.**


१. लघुसंज्ञा, व्याप्ती व प्रारंभ. ...

२. व्याख्या.

**संरक्षित स्मारके**

३. विवक्षित प्राचीन व ऐतिहासिक स्मारके संरक्षित स्मारके म्हणून समजणे.

४. प्राचीन व ऐतिहासिक स्मारके संरक्षित स्मारके म्हणून जाहीर करण्याचा राज्य सरकारचा अधिकार.

५. संरक्षित स्मारकांचे हक्क संपादन करणे. ...

६. कबुलायत करुन संरक्षित स्मारक जतन करणे. ...

७. अपात्रतेखाली येणारे किंवा कब्जा नसणारे मालक. ...

८. एखादी देणगी संरक्षित स्मारकाची दुरुस्ती करण्याच्या कामी लावणे.

९. कबुलायत करण्याचे नाकारणे किंवा ती करण्यात कसूर करणे. ...

१०. कलम ६ अन्वये केलेल्या कबुलायतीचे उल्लंघन करण्यास प्रतिबंध करण्याबाबत आदेश देण्याचा अधिकार.

११. कबुलायतीची अंमलबजावणी. ...

१२. विवक्षित विक्रीच्यावेळी खरेदीदार आणि मालकाच्या वतीने दावा सांगणारे इसम, मालकाने करुन दिलेल्या दस्तऐवजाबाबत बांधलेले असणे.

१३. संरक्षित स्मारके संपादन करणे. ...

१४. विवक्षित संरक्षित स्मारके सुस्थितीत राखणे. ...

१५. स्वेच्छेने दिलेली अंशदाने. ...

१६. पूजास्थानाचा गैरवाजवी रीतीने वापर करण्यापासून, ते भ्रष्ट होऊ देण्यापासून संरक्षण.

१७. प्राचीन स्मारकाची रम्यता जतन करणे. ...

१८. स्मारकावरील सरकारचे हक्क सोडून देणे. ...

१९. संरक्षित स्मारकाकडे जाण्यायेण्याचा हक्क. ...

## अनुक्रमणिका—चालू

**कलमे.**


**संरक्षित क्षेत्रे**

२०. पुराणवस्तुशास्त्रविषयक स्थळे व अवशेष हे संरक्षित क्षेत्र असल्याचे जाहीर करण्याचा राज्य सरकारचा अधिकार.

२१. संरक्षित क्षेत्रात मालमत्ता हक्क उपभोगण्यावर निर्बंध. ...

२२. संरक्षित क्षेत्र संपादन करण्याचा अधिकार. ...

**पुराणवस्तुशास्त्रविषयक उत्खनन**

२३. संरक्षित क्षेत्रांत उत्खनन करणे. ...

२४. उत्खनन चालू असताना सापडलेल्या पुरातन काळच्या वस्तू, वगैरे सक्तीने विकत घेणे.

**पुरातन काळच्या वस्तूंचे संरक्षण**

२५. पुरातन काळच्या वस्तू हलविण्यावर नियंत्रण ठेवण्याचा राज्य सरकारचा अधिकार.

२६. पुरातन काळच्या वस्तू राज्य सरकारने विकत घेणे. ...

**नुकसानभरपाई देण्यासंबंधीची तत्त्वे**

२७. नुकसान किंवा हानी पोहोचल्याबद्दल नुकसानभरपाई देणे. ...

२८. बाजारकिंमत किंवा नुकसानभरपाई ठरविणे. ...

२९. कलम १७ अन्वये नुकसानभरपाई संबंधीची खास तरतूद. ...

**संकीर्ण**

३०. राज्य सल्लागार मंडळ. ...

३१. अधिकार सोपविणे. ...

३२. निदेश देण्याचा अधिकार. ...

३३. शास्ति. ...

३४. अपराधांची न्यायचौकशी करण्याची क्षेत्राधिकारिता. ...

३५. विवक्षित अपराध दखल घेण्याजोगे असणे. ...

## **अनुक्रमणिका**—चालू

**कलमे.**


**संकीर्ण**—चालू

३६. दंडासंबंधी विशेष तरतुदी. ...

३७. सरकारास येणे असलेल्या रकमांची वसुली. ...

३८. संरक्षित स्मारके आणि संरक्षित क्षेत्रे असण्याचे बंद झालेली स्मारके व जागा.

३९. चुका वगैरे सुधारण्याचा अधिकार. ...

४०. या अधिनियमान्वये केलेल्या कृत्यांचे संरक्षण. ...

४१. नियम करण्याचा अधिकार. ...

४२. इतर काही विधी लागू असण्यास मनाई नसणे. ...

४३. रद्द करणे व बचाव. ...

४४. राष्ट्रीय महत्त्वाची प्राचीन स्मारके इत्यादींस हा अधिनियम लागू नसणे.